महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : एमआयएस-०१२२/प्र.क्र.२०/२०२२/३१ दिनांक - २४ मे, २०२३

## - : प्रसिद्धीपत्रक:-

**विषय :- लिपिक टंकलेखक व कर सहायक या संवर्गांच्या परीक्षांकरीता टंकलेखन कौशल्य चाचणी आयोजनाबाबत.**

**संदर्भ:-(१) जाहिरात क्रमांक ५८/२०२२ आणि ६०/२०२२.**
**(२) आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक १५ मे, २०२३ रोजीचे प्रसिध्दीपत्रक.**

महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा-२०२१ मधील लिपिक टंकलेखक व कर सहायक या संवर्गाकरीता दिनांक ०७ एप्रिल, २०२३ रोजी घेण्यात आलेल्या टंकलेखन कौशल्य चाचणीस उपस्थित उमेदवारांची टंकलेखन कौशल्य चाचणी नव्याने खालीलप्रमाणे त्यांच्या नावासमोर नमूद केलेल्या ठिकाणी, दिनांक व वेळेस आयोजित करण्यात येईल :-

| अ.क्र. | जाहिरात क्रमांक | टंकलेखन भाषा | ठिकाण | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | ५८/२०२२ आणि ६०/२०२२ | लिपिक टंकलेखक (इंग्रजी) आणि कर सहायक (इंग्रजी) | मुंबई | ३१ मे, २०२३ | सकाळी ०८:३० ते ०९:०० |
| | | लिपिक टंकलेखक (मराठी) आणि कर सहायक (मराठी) | मुंबई | ३१ मे, २०२३ | सकाळी ११:०० ते ११:३०, दुपारी ०१:३० ते ०२:००, दुपारी ०४:०० ते ०४:३० आणि सायंकाळी ०६:३० ते ०७:०० |

**२.** टंकलेखन कौशल्य चाचणीच्या ठिकाणाचा तपशील व उमेदवारांना विहित करण्यात आलेली वेळ इत्यादी तपशील स्वतंत्रपणे अवगत करण्यात येईल.

**३.** प्रस्तावित मराठी व इंग्रजी टंकलेखन कौशल्य चाचणीच्या अनुषंगाने उमेदवारांसाठी ठळक सूचना आयोगाच्या संकेतस्थळावरील Candidates Information >Instructions>General Instructions येथे 'मराठी व इंग्रजी टंकलेखन कौशल्य चाचणी करीता उमेदवारांसाठी ठळक सूचना' या सदराखाली नव्याने प्रसिध्द करण्यात येत आहेत. सदर सूचनांचे उमेदवारांनी अवलोकन करावे.

**४.** प्रस्तावित चाचणीस अनुपस्थित उमेदवारांचा अथवा चाचणीमध्ये अपात्र उमेदवारांचा निवडप्रक्रियेकरीता विचार करण्यात येणार नाही. तसेच, प्रस्तुत टंकलेखन कौशल्य चाचणी ही अंतिम समजण्यात येईल. पुन्हा चाचणी घेण्यासंदर्भात अथवा अन्य कोणत्याही विनंतीचा विचार केला जाणार नाही.

ठिकाण : नवी मुंबई

सह सचिव,
दक्षता, धोरण व संशोधन,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग